दावा दाखल तारीखः २२/०८/२०१४
दावा नोंदणी तारीखः २५/०८/२०१४
निकाल तारीखः ०१/०३/२०१६
कालावधीः १ वर्षे ६ महिने ८ दिवस

## इस्लामपूर येथील दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

**(श्रीमती) क. वि. बोरा यांचे समोर**

**नियमित दिवाणी दावा क्र.४६७/२०१४** **निशाणी ४२**

१. श्री. आनंदराव गोविंदराव सुर्वे **– कमी केले.**

२. श्री. शामराव आनंदराव सुर्वे,
वय–४२ वर्षे, धंदा– शेती,

३. सौ. हिराबाई आनंदराव सुर्वे **(मयत),**

४. सौ. सुरेखा शामराव सुर्वे,
वय–३५ वर्षे, व्यवसाय– घरकाम व शेती,

सर्वजण रा. पडवळवाडी, ता. वाळवा, जि.सांगली. **...वादी**

**विरुध्द**

१. मा. कार्यकारी अभियंता सो.
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी,
इस्लामपर, ता. वाळवा, जि. सांगली.

२. मा. जिल्हा अधिकारी सो.
सांगली, ता. मिरज, जि. सांगली. **...प्रतिवादी**

**दावाः–नुकसान भरपाईसाठी.**

| | | |
|---|---|---|
| वादीतर्फे | – | वकील श्री. व्ही. डी. पाटील. |
| प्रतिवादीतर्फे | – | वकील श्री. भोजुगडे. |

# न्यायनिर्णय
## (दिनांकः १ मार्च, २०१६)

१. वादीचे म्हणणे थोडक्यात असे की, त्यांचे एकत्र कुंटूंब असून मौजे वाळवा पोट तुकडी वाळवा, जि. सांगली येथील भूमापन क्र.२४४/१अ/१ ही त्यांची वडीलार्जित मालकी हक्क वहिवाटीची शेतजमिन आहे. सदर जमिनीचे विस्तृत वर्णन दावा कलम १ मध्ये दिलेले असून ती या दाव्याचा विषय आहे. या जमिनीत वादी भुईमूग, उस पिके घेत असतात.

२. पुढे त्यांचे म्हणणे असे की, वर नमूद दावा मिळकतीत प्रतिवादी कंपनीची ११ के.व्ही. वाळवा ए. जी. फिडररचा उच्चदाब उपरी तारमार्ग जातो. सदर तार मार्ग खूप जुना असून त्याचे खांब व त्याची काळजी घेण्याची जबाबदारी प्रतिवादींची आहे. भारतीय वीज कायदा अधिनियम तरतुदींचा विचार करता सदर खांब हे वादीचे हद्दीत असलेतरी विशेष ज्ञान व सामुग्री ही प्रतिवादींकडे असल्यामुळे ती त्यांची जबाबदारी आहे.

३. पुढे त्यांचे म्हणणे असे की, वादी यांचे वर नमूद दावा मिळकतीत त्यांनी काबाडकष्ट करुन ४ एकर आडसाली उस पिकविला होता. मात्र दि.१.१०.२०१३ रोजी दुपारी १.२५चे सुमारास दावा मिळकतीतून गेलेल्या जुनाट तारमार्गावरील पोल नं.१५ वरील वाय फेज कंडक्टर इन्सुलेटर पासून तार तुटून ठिणग्या पडल्या आणि त्यात वादीचे उस पिकाने पेट घेतला. ही आग पसरत जावून श्री उदय धोंडीराम कांबळे यांचे उस पिकास लागली. या घटनेत वादीचे आडसाली पिकाचे पूर्ण नुकसान झालेले आहे.

४. पुढे त्यांचे म्हणणे असे की, सदर घटनेबाबत वादींनी प्रतिवादी क्र.१ विरुध्द रितसर तक्रारी अर्ज दिला. त्याप्रमाणे दावा मिळकतीचा रितसर पंचनामा गावकामगार तलाठी,

वाळवा यांनी लगेचच दि.१४.१०.२०१३ रोजी केलेला आहे. साक्षीदारांचे रितसर जबाब झालेले आहेत. सहाय्यक अभियंता, म.रा.वि.वि. कंपनी उपविभाग, आष्टा यांनी घटनेच्या दिवशी घटनास्थळाचा पंचनामा परिस्थितीप्रमाणे तयार केलेला आहे. या सर्व बाबींवरुन प्रतिवादी क्र.१ कंपनीचे निष्काळजीपणामुळे व चुकीमुळे वादीचे दावा जमिनीतील आडसाली उसाचे पिक जळीत झाल्याने सुमारे रु.१०,००,०००/– नुकसान झालेले आहे.

५. पुढे त्यांचे म्हणणे असे की, सदर उस पिकावर वादीची उपजिवीका अवलंबून होती. त्यांनी सदर उस परस्पर संमतीने वादी क्र.३ व ४च्या नावे हुतात्मा सहकारी साखर कारखाना वाळवा यांचेकडे नोंदविला आहे. उस जळीत झाल्यानंतर दीड ते दोन महिन्यांनी साखर कारखाना सुरु झाला.सदर कारखान्याने जळीत उसाची परस्पर विल्हेवाट लावावी असे वादीना लेखी पत्राने कळविले होते. त्यानुसार संपूर्ण उस पिक काढून शेतजमिन साफ करण्यासाठी वादीना गडीमाणसे, शेत अवजारे याचेसाठी जादा खर्च झालेला आहे.

६. पुढे त्यांचे म्हणणे असे की, अशा परिस्थीतीत विद्युत निरीक्षक मिरज, जिल्हा सांगली यांनी प्रतिवादी क्र.१ यांना पत्र देवून ते वादीचे नुकसानीस जबाबदार आहेत असे कळविले आहे. त्यानुसार वादींनी प्रतिवादी क्र.१ कंपनीकडे दि.११.११.२०१३ रोजी लेखी अर्ज देवून नुकसान भरपाईची मागणी केली. त्यांनतर दि.२९.१.२०१४ रोजी रजिष्टर नोटीस पाठवून मागणी केली. सदर अर्ज व नोटीस मिळूनही त्यांनी वादींना नुकसान भरपाई दिली नाही . खरेतर वादींचे दहा लाख रुपयांचे नुकसान झालेले आहे. मात्र त्यांची परिस्थिती बेताची असल्यामुळे त्यांनी दावा विषयाची किंमत पाच लाख रुपयांवर कायम केली असून सदर रक्कम व्याजासह वसूल होवून मिळणेची मागणी करुन हा दावा केला आहे.

७. नि.१ वरील दि.२७.१०.२०१४चे आदेशानुसार दाव्याची चौकशी प्रतिवादी क्र.१ व २ यांचे विरुध्द एकतर्फा ठेवली.

८. निशाणी १२चे पुरसिसनुसार आणि नि.१४ व १५चे मृत्यू दाखल्यानुसार नि.१ वरील दि.२.१.२०१५चे आदेशाप्रमाणे वादी क्र.१ व ३चे नांव दाव्यातून कमी करण्यात आले.

९. चौकशीकामी वादीपैकी वादी क्र.२ शामराव यांनी स्वतःचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र नि. १६ला व अतिरीक्त सरतपास नि.१६/१ला दाखल केला. त्यासोबत मिळकतीचा ७/१२चा उतारा नि.६ला, कृषी अधिकारी वाळवा यांचा अहवाल नि.१८ला, विद्युत निरीक्षक मिरज यांचे पत्र नि.१९ला, वादीचा जबाब नि.२०ला, पंचनामा नि.२१, नोटीस नि.२२, २३, पोहोच व पोष्टाच्या पावत्या नि.२४, २५, २६, फार्म 'अ' ची नक्कल नि.२७, नकाशा नि. २८, वादीचा नुकसान भरपाईबाबतचा अर्ज नि.२९, हुतात्मा साखर कारखान्याचे पत्र नि. ३०, उसाचे वजन व दर याबाबतची माहिती नि.३१, कागदपत्रांची पूर्तता करण्याबाबतचे विद्युत मंडळाचे पत्र नि.३२ इत्यादी कागदपत्रे दाखल करुन तोंडी पुरावा संपलेची पुरसिस नि.३३ला दाखल केली.केली.

१०. सर्व कागदपत्रे व पुराव्याचे अवलोकन केले. वादींचे विदवान वकीलांचा युक्तीवाद ऐकला. त्यावरुन खालील मुद्दे उपस्थित झाले त्यांना त्या अनुषंगाने उत्तरे दिली.

| क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दाव्यात कथन केल्याप्रमाणे प्रतिवादी क्र.१ यांचे हलगर्जीपणामुळे व निष्काळजीपणामुळे वादीचे दावा मिळकतीतील आडसाली उसाचे पिक जळून वादीचे सुमारे रु.१०,००,०००/- पर्यंतचे नुकसान झाले असे वादी शाबीत करतात काय ? | होय. |

| | | |
|---|---|---|
| २. | दाव्यातील मागणीप्रमाणे व्याजासह नुकसान भरपाईची रक्कम वादी प्रतिवादी क्र.१ व २ यांचेकडून वैयक्तिक व संयुक्तिकरित्या वसूल होवून मिळणेस वादी पात्र आहेत काय ? | होय, फक्त प्रतिवादी क्र.१ यांचेकडून. |
| ३. | परिणाम ? | अंतीम आदेशाप्रमाणे |

## कारणमिंमासा

**मुद्दा क्र.१ बाबतः**

११. वादींनी आपल्या सरतपासातून दाव्यातील नमूद सर्व बाबीं सविस्तर सांगितल्या. प्रतिवादींना पुरेशी संधी देवूनही त्यांनी म्हणणे दाखल केले नाही अथवा अन्य पुरावाही दिला नाही. आपल्या सरतपासासोबत वादींनी जी कागदपत्रे दाखल केली त्यात वादीचा नि.७ला ७/१२चा उतारा असून त्याव्दारे दावा मिळकतीचे ते कब्जेदार असून सन २०१३–२०१४ साली त्याचा या मिळकतीत उस होता असे स्पष्ट होते.

१२. त्यानंतर त्यांनी तालुका कृषी अधिकारी यांचे पत्र नि.१८ला दाखल केले. त्यानुसार मंडल कृषी अधिकारी, आष्टा यांनी केलेल्या पाहणीच्या अहवालावरुन व गावकामगार तलाठी यांनी नोंदलेला जबाब व पंचनाम्याचे आधारे जळालेल्या उसाची २० टक्के घट अपक्षेप्रमाणे एकूण झालेल्या नुकसानीची रक्कम रु.५,५०,०००/– असल्याचा दाखला त्यांनी दिला असल्याचे दिसते.

१३. त्यानंतर त्यांनी नि.१९ला महाराष्ट्र शासन, विद्युत निरीक्षक, विद्युत निरीक्षण विभाग, मिरज यांनी कार्यकारी अभियंता म.रा.वि.वि. लि. इस्लामपूर यांना पाठविलेल्या पत्राची प्रत दाखल केली. त्यांचे त्या पत्रानुसार त्यांनी भारतीय विज अधिनियम २००३ कलम १६१ नुसार जळीत अपघाताची कार्यालयीन चौकशी केली असून सदर जळीत अपघात वीज

कंपनीचे संच मांडणीमुळे घडला असल्याचे मत नोंदवून सदर नुकसान भरपाईस महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी जबाबदार आहे असे त्यांचे मत आहे.

१४. या व्यतिरीक्त वादींनी त्यांच्या झालेल्या जबाबाची प्रत, घटनास्थळाच्या पंचनाम्येची प्रत, त्यांनी प्रतिवादी क्र.१ व २ यांना पाठविलेली नोटीस, त्यांना ती मिळाल्याची पोहोच ही कागदपत्रे दाखल केली. त्या सोबत त्यांनी म.रा.वि.वि.कंपनीचा जळीत उसाबाबत फार्म 'अ' मधील अहवाल दाखल केला. ज्याच्यात सदर कंपनीचे सहाय्यक अभियंता यांनी निरीक्षणाअंती ११ के.व्ही. ए. जी. फिडररचा वाय फेज कंडक्टर सरकून खाली वादीचे शेतात पडल्याने ठिणग्या उडाल्याने तेथील उस जळाला अशी नोंद घेतली आहे. सदर सहाय्यक अभियंता यांनी जागेच्या वस्तुस्थितीदर्शक परिस्थितीच्या पंचानाम्याची प्रतदेखील वादींनी दाखल केलेली आहे.

१५. या सोबतच वादींनी कारखान्याचे प्रमाणपत्र नि.३१ला दाखल केले. त्यावरुन २०१० ते २०१३ पर्यंत त्यांनी त्या कारखान्यास गळीतास जो उस पुरवठा केला त्याचा दर व माहिती त्यात नमूद आहे. तसेच नि.३०च्या कारखान्याचे पत्रानुसार गळीत हंगाम २०१२–२०१४ साठी दावा जमिनीतील १.६० आर क्षेत्राचा उस नोंदला असून तो दि. १३.१०.२०१३ रोजी जळीत झाल्यामुळे आणि त्या दिवशी कारखाना सुरु नसल्यामुळे तो गळीतास नेता येत नाही म्हणून त्याची इतरत्र विल्हेवाट करावी अशी विनंती कारखान्याने वादीला केलेली आहे.

१६. अशाप्रकारे हा सर्व विना आव्हानीत पुरावा एकत्रितरित्या जर पाहिला तर दावा मिळकतीत दि.१३.१.२०१३ रोजी १.६० आर क्षेत्रात म्हणजे ४ चार एकर क्षेत्रात वादीचा

आडसाली उस होता हे निश्चीतपणे शाबीत होते. तसेच प्रतिवादी क्र.१ कंपनीचे सहाय्यक अभियंता व महाराष्ट्र शासन, विद्युत निरीक्षण विभाग, मिरज, जिल्हा सांगली यांनी दिलेले प्रमाणपत्र व अभिप्रायानुसार वादीचे या क्षेत्रावरील आडसाली उस दि.१३.१०.२०१३ रोजी दुपारी १.२५ वाजणेच्या सुमारास प्रतिवादी क्र.१ कंपनीचा पोल नं.१५ वरील वाय फेज कंडक्टर इन्सुलेटर पासून तार तुटून ठिणग्या पडून जळाला व ही आग पसरत जावून श्री उदय धोंडीराम कांबळे यांचे उस पिकासही लागली असेही सिध्द होते. एवढेच नव्हेतर या अभिप्रायानुसार सदर अपघात विज कंपनीचे संच मांडणीने झालेली असून नुकसान भरपाईस प्रतिवादी क्र.१ कंपनीच जबाबदार असल्याचे सिध्द होते.

१७. वादींनी आपल्या दाव्यात त्यांचे दहा लाख रुपयांचे नुकसान झाल्याचे सांगितले. तपासाअंती तालुका कृषी अधिकारी, वाळवा इस्लामपूर यांनी जो दाखला दिला त्यानुसार सदर नुकसान रु.५,५०,०००/– इतके असल्याचे सिध्द होते. या शिवाय वादीचा उस कारखान्याला गेला नाही म्हणून जळालेल्या उसाचा निचरा करण्यासाठी व दावा मिळकतीची साफसफाई करण्यासाठी वादींना निश्चीतपणे काही खर्च आला असेल. मात्र त्याबाबत वादींनी पुरावा दिलेला नाही.

१८. या दाव्यातून वादीने आपली मागणी रु.५,००,०००/– एवढीच मर्यादीत ठेवली असल्यामुळे त्यांनी जरी तो पुरावा दिला नाही तरी निश्चीतपणे रु.५,००,०००/– वर त्यांचे नुकसान जाईल असे तालुका निरीक्षक अधिका–यांचे अहवालावरुन सिध्द होते व सदर नुकसान जर प्रतिवादी क्र.१ कंपनीने आपल्या विद्युत संचाची नीट काळजी घेतली असती तर निश्चीतपणे झाले नसते असे सिध्द होत असल्यामुळे या मुद्यास होकारार्थी उत्तर दिले.

**मुद्दा क्र.२ बाबतः**

१९. मुद्दा क्र.१चे उत्तरास अनुषंगून प्रतिवादी क्र.१ कडून निश्चीतपणे वादी ही नुकसान भरपाई वसूल होवून मिळणेस पात्र आहेत. मात्र प्रतिवादी क्र.२ यांचा या घटनेशी कसा संबंध आहे याबद्दल वादींनी दाव्यात कथन केलेले नाही व कोणताही पुरावा दिला नाही. म्हणून प्रतिवादी क्र.२ यांना संयुक्तिक किंवा वैयक्तिक या नुकसानीस जबाबदार ठरविता येणार नाही. परिणामी या नुकसानीस केवळ प्रतिवादी क्र.१च जबाबदार असल्याने या मुद्यास त्याप्रमाणे अशंतः होकारार्थी उत्तर दिले.

**मुद्दा क्र.३ बाबतः**

२०. वरील चर्चेस अनुसरुन खालीलप्रमाणे आदेश पारीत केला.

**आदेश**

१. दावा खर्चासह मंजूर केला असून या दाव्याचा खर्च प्रतिवादी क्र.१ यांनी वादींना द्यावा.

२. पुढे याव्दारे प्रतिवादी क्र.१ यांना असा आदेश देण्यात येत आहे की, त्यांनी वैयक्तिक वादींना दावा मिळकतीतील उसाचे जळीत अपघाताचे नुकसान भरपाईबद्दल रु.५,००,०००/-(पाच लाख रुपये) ही रक्कम व त्यावर अपघाताचे तारखेपासून म्हणजे दि.१३.१०.२०१३ पासून ते संपूर्ण रक्कम वसूल होई पावेतो दरसाल दर शेकडा ६ टक्के दराने व्याजासह द्यावी.

३. येणेप्रमाणे हुकूमनामा करावा.

समक्ष न्यायालयात जाहीर.

**सही/-**

**इस्लामपूर.** **(श्रीमती) क.वि. बोरा**

**दिनांकः१ मार्च, २०१६.** **दिवाणी न्यायाधिश,व.स्तर,इस्लामपूर.**